Department of Agriculture
Government of Maharashtra

The World bank assisted

# Hon. Balasaheb Thackeray Agribusiness & Rural Transformation (SMART) Project

## मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प

# शेतमालाच्या संभाव्य किमतींचा अहवाल– मार्च २०२३

## बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष,

प्रकल्प अंमलबजावणी कक्ष – कृषी

फेब्रुवारी २०२३

# सोयाबीनच्या संभाव्य किंमती- मार्च २०२३

सोयाबीन हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्वाचे तेलबिया पिक आहे. अमेरिका, ब्राझील, आर्जेन्टिना, चीन व भारत या देशात सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. या प्रमुख देशातून जागतिक उत्पादनाच्या सुमारे ९० टक्के सोयाबीनचे उत्पादन होते. त्यामुळे या देशातील सोयाबीनची मागणी,पुरवठा व उपभोग या घटकामध्ये होणाऱ्या बदलाचा सोयाबीनच्या किमतीवर परिणाम होत असतो. अमेरिकन कृषी विभागाच्या, (WASDE, जानेवारी- २०२३) अहवालानुसार सन २०२२-२३ मध्ये, जगात ३८८ दशलक्ष टन सोयाबीनचे उत्पादन होण्याची शक्यता वर्तविली आहे. जे मागील वर्षीच्या तुलनेत ८ टक्केनी (३५८ दशलक्ष टन, २०२१-२२) अधिक आहे. भारतात सन २०२२-२३ मध्ये सोयाबीनचे उत्पादन १२ दशलक्ष टन उत्पादन होण्याची शक्यता वर्तीवली आहे. जे मागील वर्षीच्या तुलनेत जास्त आहे. मागील वर्षी (२०२१-२२) मध्ये ११.९० दशलक्ष टन उत्पादन झाले आहे.

महाराष्ट्र शासन, कृषी विभागाच्या, प्रथम अंदाज अहवालानुसार, महाराष्ट्रात खरीप हंगाम २०२२-२३ मध्ये, सोयाबीनचे उत्पादन ६.५८ दशलक्ष टन उत्पादन होण्याची शक्यता वर्तीवली आहे. मागील वर्षी (२०२१-२२) ५.४ दशलक्ष टन उत्पादन झाले होते.

मागील तीन महिन्याच्या कालावधीत (डिसेंबर २०२२ ते फेब्रुवारी २०२३) या दरम्यान लातूर बाजारातील सोयाबीनच्या किमतींत घसरता कल दिसून येतो. नोव्हेंबर २०२२ मध्ये सोयाबिनच्या सरासरी किमती रु. ५३५४ प्रती क्वि. वरून डिसेंबर २०२२ मध्ये रु. ५२९८ प्रती क्वि. झाल्या व जानेवारी २०२३ मध्ये रु. ५३९२ प्रती क्वि. होत्या .

सन २०२२-२३ या खरीप हंगामासाठी सोयाबीनची किमान आधारभूत किमत (MSP) रु.४३०० प्रती क्कि. आहे. मागील तीन महिन्यातील इंदूर बाजारातील सोयाबीनच्या किंमती व भारतातील APMC बाजारातील आवक पुढील प्रमाणे-

| महिना | लातूर बाजारातील सरासरी किंमती ( रु/क्विंटल) | भारतातील APMC बाजारातील आवक (मे. टन) |
|---|---|---|
| डिसेंबर २०२२ | ५५५६ | ७,५०,६५८ |
| जानेवारी २०२३ | ५३९२ | ४,९८,७१० |
| फेब्रुवारी २०२३ | ५३१६ | ४,९२,६५३ |

मागील काही वर्षातील किमतीचे अर्थमिती विश्लेषण व बाजारातील सद्यस्थिती विचारात घेता, माहे **मार्च २०२३** या कालावधीत लातूर बाजारात सोयाबीनच्या संभाव्य किमती **रु. ५१०० ते ५७००** प्रती क्विंटल या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. पुढील दोन महिन्याच्या कालावधीत (एप्रिल -मे २०२३) सोयबीनच्या किमतीतीत काही प्रमाणात वाढ होण्याची शक्यता आहे.

# कापसाच्या संभाव्य किंमती मार्च २०२३

कापूस हे भारतातील सर्वात महत्वाच्या व्यावसायिक पिकांपैकी एक प्रमुख पिक आहे. भारतातील आर्थिक महत्त्वामुळे याला "व्हाइट-गोल्ड" असेही संबोधले जाते. अंदाजे ६ दशलक्ष कापूस उत्पादक शेतकरी आणि ४०-५० दशलक्ष कापूस प्रक्रिया आणि व्यापार यामध्ये गुंतलेल्या लोकांचे जीवनमान टिकवून ठेवण्यासाठी कापूस पिक प्रमुख भूमिका बजावते.

जागतिक स्तरावर भारत हा प्रमुख कापूस उत्पादक देश असून त्यानंतर चीन आणि अमेरिका यांचा क्रमांक लागतो. एकूण जागतिक कापूस उत्पादनात भारताचा वाटा सुमारे २५ टक्के आहे. वर्ष २०२२-२३ दरम्यान भारतात अंदाजे कापूस उत्पादन मागील वर्षाच्या तुलनेत ५ टक्क्यांनी वाढण्याचा अंदाज आहे तसेच जागतिक स्तरावर अंदाजे उत्पादन ०.७२ टक्क्यांनी वाढणार असल्याचे दिसून येते. राष्ट्रीय आयात आणि निर्यातीच्या बाबतीत, वर्ष २०२२-२३ दरम्यान मागील वर्षाच्या तुलनेत आयातीत ५५ टक्के वाढ आणि निर्यातीत २३ टक्के घट होण्याचा अंदाज आहे. हाच कल जागतिक स्तरावर मागील वर्षाच्या तुलनेत आयातीत ३.८४ टक्क्यांनी वाढलेला दिसत असून निर्यातीत १.८१ टक्क्यांनी घट होणार असल्याचे दिसून येते. जागतिक स्तरावर चीन प्रमुख कापूस उपभोक्ता असून चीनचा वाटा ३३ टक्के आहे त्यानंतर भारताचा क्रमांक लागतो. वर्ष २०२२-२३ मध्ये देशांतर्गत उपभोग देखील राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावर २ टक्क्यांनी कमी होणार असल्याचा अंदाज दिसून येत आहे. (स्रोत: USDA)

सन २०२२-२३ हंगामासाठी कापसाची किमान आधारभूत किंमत लांब धाग्याच्या कापसासाठी रु. ६३८० प्रति क्विंटल व मध्यम धाग्याच्या कापसासाठी रु. ६०८० प्रति क्विंटल इतकी आहे.

अकोला बाजारातील कापसाच्या किमती स्थिर आहेत आणि वायदा बाजारातील भावही स्थिर आहेत. MCX प्लॅटफॉर्मवर २४ फेब्रुवारी २०२३ रोजी कापसाच्या वायदा बाजारातील किमती खालीलप्रमाणे आहेत:

| डिलिव्हरी महिना | किंमती रु. (प्रति कँडी ३५६ किलो.) |
|---|---|
| एप्रिल २०२३ | ६३७४० |
| जुन २०२३ | ६४००० |
| ऑगष्ट २०२३ | ६३८०० |

गेल्या तीन महिन्यांतील अकोला बाजारपेठेतील कापसाचे सरासरी भाव आणि भारतातील आवक पुढीलप्रमाणे आहे.

| महिना / वर्ष | कापसाची किमत (रु. / प्रति क्विंटल) | भारतातील कापसाची आवक (टन) |
|---|---|---|
| डिसेंबर २०२२ | ८६०४ | ५९४७१७ |
| जानेवारी २०२३ | ८३५० | ६५३७५३ |
| फेब्रुवारी २०२३ | ८१६६ | ५७२११९ |

कापसाची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील मार्च महिन्याची किमत रु १८२०० प्रति क्विंटल इतकी राहील असे ग्राह्य धरून (माहितीचा स्रोत: USDA / ICAC) तसेच मागील ११ वर्षांच्या किंमतीच्या गुणात्मक व परिमाणवाचक विश्लेषणानुसार तसेच बाजारातील सध्यस्थितीवरून, मार्च २०२३ या कालावधीत अकोला बाजारातील कापसाची संभाव्य किंमत सरासरी रु. **८००० ते ८५००** प्रति क्विंटल या दरम्यान राहील. पुढील दोन महिने म्हणजे एप्रिल आणि मे २०२३ पर्यंत कापसाच्या किमतीत उच्च तफावत होण्याची शक्यता फारच कमी असल्याने किमतीचा कल स्थिर असु शकतो.

# तूरीच्या संभाव्य किंमती- मार्च २०२३

भारत हा जगातील सर्वात मोठा तूर उत्पादक तसेच उपभोक्ता देश आहे. भारतातील तूर उत्पादनात महाराष्ट्र, कर्नाटक आणि उत्तर प्रदेश राज्यांचा वाटा ६० टक्के पेक्षा जास्त आहे. भारत सरकार, कृषि विभागाच्या सन २०२२-२३ या वर्षासाठीच्या खरीप पिकांच्या दुसरा उत्पादन आगाऊ अंदाजानुसार ३६.४४ लाख टन तूर उत्पादन होण्याची शक्यता आहे, जे मागील वर्षी (२०२१-२२ मध्ये ४२.२० लाख टन) पेक्षा १०% कमी आहे. महाराष्ट्र शासन, कृषी विभागाच्या सन २०२२-२३ या वर्षासाठी पहिल्या आगाऊ अंदाजानुसार, राज्यात ८.४८ लाख टन तूर उत्पादन होण्याची शक्यता आहे.

तूरीच्या बाजारपेठेवर मागील वर्षातील तूर साठा, आयात तसेच चालू वर्षातील उत्पादन यांचा परिणाम होताना दिसतो. केंद्र शासनाने तूर निर्यातीसाठी खुली केली असून तूरीचा आयात कोटा मर्यादित ठेवलेला आहे. आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी ४ लक्ष टन इतकी मर्यादा ठरवून दिली आहे. विदेशी व्यापार महासंचालनालय (DGFT) ने प्रकाशीत केलेल्या अहवालानुसार तूरीसाठीचे -मुक्त आयात धोरण मार्च २०२४ पर्यंत वाढवण्यात आले आहे.

सन २०२२-२३ साठी तूरीची किमान आधारभूत किंमत रु. ६,६००/- प्रति क्विंटल इतकी आहे. अकोला बाजारात गेल्या तीन महिन्यांपासून तूर दरात चढउतार दिसून येत आहे. डिसेंबर २०२२ मध्ये तूरची सरासरी किंमत रु. ७०५२ प्रति क्विंटल होती आणि फेब्रुवारी २०२३ मध्ये रु. ७२११ प्रति क्विंटल पर्यंत वाढ झाली आहे. मागील तीन महिन्यातील अकोला बाजारातील तुरीच्या सरासरी किंमती व भारतातील APMC बाजारातील आवक पुढील प्रमाणे-

| महिना | अकोला बाजारातील सरासरी किंमती ( रु/क्विंटल) | भारतातील APMC बाजारातील आवक ( मे. टन) |
|---|---|---|
| डिसेंबर २०२२ | ७०५२ | ४४,९९१ |
| जानेवारी २०२३ | ६८९३ | १७०,३०९ |
| फेब्रुवारी २०२३ | ७२११ | २०९,४११ |

मागील काही वर्षातील किमतीचे अर्थमिती विश्लेषण व सध्यस्थितीत बाजाराचा कल विचारात घेता, अकोला बाजारपेठेतील तूरीची किंमत माहे मार्च २०२३ मध्ये **रु. ६८०० ते ७३००/-** प्रति क्विंटल या दरम्यान राहण्याची शक्यता आहे तसेच पुढील २ महिन्यांच्या कालावधीत (एप्रिल व मे २०२३) तुरीच्या किमतीत काही प्रमाणात वाढ होण्याची शक्यता आहे.

# हरभऱ्याच्या संभाव्य किंमती - मार्च २०२३

हरभरा हे भारतातील मोठ्या प्रमाणावर उत्पादन आणि उपभोग असणारे डाळवर्गीय पिक आहे. जागतिक पातळीवर एकूण डाळ उत्पादनापैकी २० टक्के हिस्सा हरभऱ्याचा आहे. भारत, ऑस्ट्रेलिया, तुर्की, म्यानमार, पाकिस्तान आणि इथिओपियासह सहा देश जागतिक हरभरा उत्पादनात सुमारे ९० टक्के योगदान देतात. भारत हा हरभऱ्याचा प्रमुख उत्पादक देश असून जगातील एकूण उत्पादनात भारताचा वाटा सुमारे ७०-७५ टक्के आहे. भारतातील एकूण डाळ उत्पादनापैकी ४०-५० टक्के हिस्सा हरभऱ्याचा आहे.

सन २०२१-२२ मध्ये भारतातील एकूण हरभऱ्याचे उत्पादन १३५ लाख टन इतके होते. सन २०२२-२३ मध्ये हरभऱ्याचे अंदाजे उत्पादन सुमारे १३६ लाख टन असण्याची शक्यता आहे. सन २०२०-२१ या कालावधीत भारताच्या एकूण डाळींच्या निर्यातीत सुमारे ६० टक्के वाटा हरभऱ्याचा आहे.सन २०२३-२४ या हंगामासाठी हरभऱ्याची किमान आधारभूत किमत (MSP) रु.५३३५ प्रती क्विंटल आहे.

मागील तीन महिन्यातील लातूर बाजारातील हरभऱ्याच्या सरासरी किंमती व भारतातील APMC बाजारातील आवक पुढील प्रमाणे-

| महिना | लातूर बाजारातील सरासरी किंमती ( रु/क्विंटल) | भारतातील APMC बाजारातील आवक ( मे. टन) |
|---|---|---|
| डिसेंबर २०२२ | ४४९२ | १०४,४१८ |
| जानेवारी २०२३ | ४५९४ | ७६२९६ |
| फेब्रुवारी २०२३ | ४७२६ | २४२९४६ |

मागील काही वर्षातील किमतीचे अर्थमिती विश्लेषण व बाजारातील सद्यस्थिती विचारात घेता, माहे **फ्रेब्रुवारी २०२३** या कालावधीत लातूर बाजारात हरभऱ्याच्या संभाव्य किमती **रु. ४५०० ते ५०००** प्रती क्विं. राहण्याची शक्यता आहे तसेच पुढील २ महिन्यांच्या कालावधीत (एप्रिल व मे २०२३) हरभऱ्याच्या किमतीत काही प्रमाणात घट होण्याची शक्यता आहे

# कांद्याच्या संभाव्य किंमती – मार्च २०२३

कांदा (ॲलियम सेपा एल.) हे भारतातील विविध भागांमध्ये घेतले जाणारे एक महत्त्वाचे व्यावसायिक भाजीपाला पिक आहे. कांदा भारतीय आहारातील सर्वात महत्त्वाच्या वस्तूंपैकी एक आहे. लोकसंख्या आणि उत्पन्न होणाऱ्या वाढीमुळे कांद्याचा वापर वाढत आहे. कांदा पिक नाशवंत असल्याने किमतीत मोठ्या प्रमाणात चढ-उतार होताना दिसून येतात. भारत हा जगातील दुसरा क्रमांकाचा कांदा उत्पादक देश असून एकूण जागतिक उत्पादनात २०% वाटा आहे (FAO, २०२०). भारतात खरीप व रब्बी हंगामात कांद्याचे उत्पादन घेतले जाते. खरीप आणि लेट खरीप हंगामातील मिळून उत्पादनाचा एकूण कांद्याच्या उत्पादनात सुमारे ६० टक्के वाटा आहे. खरीप हंगामातील उत्पादन ऑक्टोबर ते जानेवारी या महिन्यात बाजारात येते. रब्बी कांदा पिकाची विक्री एप्रिल ते जून दरम्यान केली जाते.

सन २०२०-२१ च्या आकडेवारी नुसार महाराष्ट्राचा कांद्या उत्पादनात देशात प्रथम क्रमांक लागतो (३९%), त्यापाठोपाठ कर्नाटक (१७%) आणि मध्य प्रदेश (१०%)या राज्याचा क्रमांक लागतो. कृषी मंत्रालयाच्या २०२१-२२ साठीच्या तिसऱ्या आगाऊ अंदाज अहवालानुसार नुसार, सन २०२१-२२ मध्ये ३१२ लाख टन कांद्याचे उत्पादन होण्याची शक्यता वर्तीवली आहे.

महाराष्ट्रात सन २०२१-२२ मध्ये, लाख हेक्टरवर कांदा लागवड झाल्याचा अंदाज आहे, मागील वर्षी (२०२१-२२) ९.४५ लाख हेक्टर क्षेत्र कांदा पिकाखाली होते. सन २०२२-२३ साठी ३१.१२ दशलक्ष टन कांद्याचे उत्पादन होण्याची शक्यता वर्तीवली आहे, जे मागील वर्षाच्या तुलनेत १६.८१ टक्केनी जास्त आहे. (२०२१-२२ मध्ये २६.६४ दशलक्ष टन). महाराष्ट्रात सन २०२२-२३ मध्ये १०२.२२ लाख टन कांदा उत्पादन होण्याचा अंदाज आहे. राज्यात २०२१-२२ मध्ये १३६.६८ लाख टन कांदा उत्पादन झाले होते. (फलोत्पादन विभाग, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन).

मागील तीन महिन्याच्या कालावधीत (डिसेंबर २०२२ ते फेब्रुवारी २०२३ ) या दरम्यान लासलगाव बाजारातील कांद्याच्या किमतींत घसरता कल दिसून येतो. डिसेंबर -२०२२ मध्ये कांद्याची सरासरी किमती रु. १४९३ प्रती क्विं. वरून जानेवारी २०२३ मध्ये रु. १३९५ प्रती क्विं. पर्यत कमी झाल्या आणि फेब्रुवारी २०२३ मध्ये रु. ८४० प्रती क्विं. पर्यंत कमी झाल्या आहेत. कारण या कालावधीतीत आवक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मागील महिन्यातील लासलगाव बाजारातील कांद्याचे सरासरी भाव व भारतातील आवक खालील तक्त्यात दर्शिवली आहे.

| महिना | लासलगाव बाजारातील सरासरी किंमती ( रु/क्विंटल) | भारतातील APMC बाजारातील आवक ( मे. टन) |
|---|---|---|
| डिसेंबर २०२२ | १४९३ | १६,००,८७९ |
| जानेवारी २०२३ | १३९५ | १४,०३,४५९ |
| फेब्रुवारी २०२३ | ८४० | १६,८९,३९८ |

मागील काही वर्षातील किमतीचे अर्थमिती विश्लेषण व बाजारातील सद्यस्थिती विचारात घेता, माहे **मार्च २०२३** या कालावधीत लासलगाव बाजारात कांद्याच्या सरासरी संभाव्य किमती **रु.७०० ते रु. १००० प्रती क्विंटल** या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. पुढील दोन महिन्याच्या कालावधीत (एप्रिल – मे २०२३) कांद्याच्या किंमतीत किंचित वाढ होण्याची शक्यता आहे.

# मक्याच्या संभाव्य किंमती : मार्च २०२३

मका हे आंतराष्ट्रीय स्तरावरील महत्वाचे अन्नधान्य पीक आहे. अमेरिका, चीन, ब्राझील, अर्जेंटिना आणि भारत या देशात मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. या प्रमुख देशांमध्ये एकूण जागतिक उत्पादनाच्या ७६ टक्के उत्पादन होते. त्यामुळे या देशातील मक्याची मागणी, पुरवठा व उपभोग या घटकांमध्ये होणाऱ्या बदलाचा मक्याच्या किंमतीवर परिणाम होत असतो. अमेरिकेच्या कृषी विभागाच्या (World Agricultural Production, Feb- २०२३), अहवालानुसार सन २०२२-२३ मध्ये, जगात ११५६ दशलक्ष मेट्रिक टन उत्पादन होण्याच्या शक्यता आहे, जे मागील वर्षांच्या तुलनेत ४.८५ टक्के कमी होण्याचा अंदाज आहे, मागील वर्षी जागतिक १२१५ दशलक्ष मेट्रिक टन उत्पादन झाले होते. भारत सरकार कृषी विभागाच्या दुसऱ्या अग्रीम अन्नधान्य उत्पादन अंदाजानुसार देशात सन २०२२-२३ या वर्षी मक्याचे उत्पादन ३४.६ दशलक्ष टन होईल असा अंदाज आहे.

मागील तीन महिन्यात डिसेंबर २०२२ ते फेब्रवारी २०२३ दरम्यान नांदगाव बाजारात मक्याच्या किंमतीचा वाढता कल दिसून येतो. डिसेंबर २०२२ मध्ये मक्याची सरासरी किंमत रुपये २०१४ प्रति क्विंटल होती, तर फेब्रवारी २०२३ महिन्यात किंमतीत वाढ होऊन सरासरी रुपये २०९८ प्रति क्विंटल इतकी होती. खरीप हंगाम २०२२-२३ साठी मका पिकाची आधारभूत किंमत (MSP) रु. १९६२ प्रति क्विं. इतकी आहे

मागील तीन महिन्यातील नांदगाव बाजारातील मक्याच्या सरासरी किंमती आणि भारतातील मक्याची आवक पुढील प्रमाणे:

| महिना/वर्ष | नांदगाव बाजारातील मक्याच्या किंमती (रुपये/क्विंटल) | भारतातील मक्याची आवक (टन) |
|---|---|---|
| डिसेंबर २०२२ | २०१४ | ८८४४९५ |
| जानेवारी २०२३ | २१०३ | ३९८८२८ |
| फेब्रवारी २०२३ | २०९८ | २६०३३५ |

दिनांक २४ फेब्रवारी २०२३ रोजीच्या NCDEX छिंदवाडा बाजारातील मक्याच्या फ्युचर्स किंमती खालील प्रमाणे:

| महिना | किंमती (रुपये/क्विंटल) |
|---|---|
| २० मार्च २०२३ | २११० |
| २० एप्रिल २०२३ | २१२३ |
| १९ मे २०२३ | २१३४ |
| २० जुन २०२३ | २१४७ |

मागील काही वर्षातील मक्याच्या किंमतीचे अर्थमिती विश्लेषण व बाजारातील सद्यस्थिती, माहे फेब्रुवारी २०२३ या कालावधीत नांदगाव बाजारातील मक्याच्या संभाव्य किंमती **रुपये २००० ते २३००० प्रति क्विंटल** दरम्यान राहण्याच्या शक्यता आहे. हा किंमतीचा अंदाज वाजवी सरासरी मक्याच्या गुणवत्तेसाठी असेल. एप्रिल २०२३ मध्ये मक्याची किंमत स्थिर राहील. तथापि, मे २०२३ मध्ये रब्बी आवक वाढल्याने किमती कमी होण्याची शक्यता आहे.पुढील अहवाल मार्च २०२३ मध्ये प्रकाशित केला जाईल.

***टीप: सदर अहवाल हा बाजाराची सद्यस्थिती व भविष्यकालीन किंमतीविषयक अनुमान दर्शिवितो. आंतरराष्ट्रीय किंमती, हवामान, आर्थिक घटक, आणि सरकारी धोरण यामध्ये होणाऱ्या बदलामुळे संभाव्य किंमतीमध्ये बदल होऊ शकतो. परिणामी वास्तविक किंमती या संभाव्य किंमती पेक्षा वेगळ्या असू शकतात. त्यामुळे वाचकांनी या अहवालाचा काळजीपूर्वक वापर करावा***

अधिक माहितीसाठी

## बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष

### प्रकल्प अंमलबजावणी कक्ष- कृषि

# मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प

एम.एस.एफ.सी बिल्डींग, २७० भाम्बुर्डा, नारायण एस.बी.मार्ग,
सिंबायोसिस कॉलेज, गोखले नगर, पुणे ४११०१६
फोन: ०२०-२५६५६५७७, टोल फ्री नं.: १८०० २१० १७७०, ई-मेल: mirmc.smart@gmail.com, वेबसाईट:

https://www.smart-mh.org/